


कामगार, शेतकरी, कष्टकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणारे

साप्ताहिक

# क्रांतिवीर

संपादक-मोहन गुंड

skrantiveer66@gmail.com

**क्रांतिवीर**

बीड जिल्ह्यात तालुका,शहर प्रतिनिधी नेमणे आहेत, इच्छुकानी संपर्क साधावा

मोबा.९४२३९७९४९२

वर्ष १३ वे अंक ३० वा | सोमवार,दि.९ मार्च २०२६ | RNI.No.MHMAR/ 2013/50191 | पाने ४ | किंमत १ रुपये

# कर्ज फेडण्यासाठी राज्यात 19 शेतकऱ्यांनी किडनी विकल्या तरी सरसगट कर्ज माफी नाही

## सरकारने कर्ज माफिच्या घोषणा करून शेतकऱ्यांना फसवू नये-भाई मोहन गुंड



बीड/क्रांतिंवीर प्रतिनिधी

राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालले असताना शासनाकडून पुन्हा एकदा कर्जमाफी आणि अनुदानाच्या घोषणा करण्यात येत आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे थकीत कर्ज माफ करण्याचा आणि नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. शेतकऱ्यांनी कर्जाची परतफेड करण्यासाठी राज्यात तब्बल १९ शेतकऱ्यांनी किडन्या विकल्या आहेत, तरी पण आपण सरसकट कर्जमाफी देत नाहीत हे शेतकऱ्याचे दुर्दैव आहे , किती समीती गठीत करणार, शेतकऱ्याच वजोवटोळ करण्याचा सरकल्याने विडाच उचला आसतर आम्ही रस्त्यावर उतरु असा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी दिला आहे..

आधी ही सरकारने अशा प्रकारच्या घोषणा झाल्या होत्या आणि प्रत्यक्षात अनेक शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळालाच नाही, ही वस्तुस्थिती सर्वांसमोर आहे. पूर्वी नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन देण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात हजारो शेतकरी त्या योजनेपासून वंचित राहिले. त्यामुळे सध्याची घोषणा देखील शेतकऱ्यांच्या नजरेत विश्वासार्ह वाटत नाही. याबद्दल शंका निर्माण होत आहे.

खरं पाहिलं तर शासनाचे धोरण शेतकऱ्यांना कर्ज घेण्यास प्रवृत्त करणारे झाले आहे. कर्ज काढा आणि नंतर कर्जमाफीसाठी भिक मागा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. रोज शेतकरी मृत्यूला कवठाळत आहे , शेतकरी कर्जबाजारी होऊच नयेत यासाठी ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याऐवजी केवळ कर्जमाफीच्या घोषणा करून तात्पुरता दिलासा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही स्थिती म्हणजे रिंन काढून दिवाळी साजरी करणे या म्हणी



प्रमाणे आहे. आज जगातील अनेक देश शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान, बाजारपेठ व्यवस्थापन आणि उत्पादन खर्च कमी करण्यावर भर देत आहेत. मात्र भारतात अजूनही शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे उत्तर कर्जमाफी आणि अनुदान यामध्येच शोधले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची खरी प्रगती होत नाही, उलट त्यांच्या समस्या अधिक गुंतागुंतीच्या होत जातात. खरंतर शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनाने खालील बाबींवर भर देणे अत्यंत आवश्यक आहे शेतीमालाला योग्य आणि हमीभाव निश्चित करणे, उत्तम आणि परवडणारी खते व बियाणे उपलब्ध करून देणे शेतकऱ्यांच्या मालासाठी मजबूत बाजारपेठ निर्माण करणे , शेती उत्पादन साठवणूक व प्रक्रिया उद्योग वाढवणे थेट ग्राहकांपर्यंत शेतमाल पोहोचवण्याची व्यवस्था उभी करणे शेतकऱ्यांना वारंवार कर्जमाफी देण्यापेक्षा त्यांना स्वाभिमानाने शेती करता येईल अशी व्यवस्था उभी करणे हे शासनाचे खरे कर्तव्य आहे. अन्यथा कर्जमाफीच्या घोषणा या केवळ राजकीय दिखावा करू नका, सरसकट कर्ज माफी द्या, अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने जन आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते भाई मोहन गुंड यांनी दिला आहे..

# धार्मिक कार्यासाठी जयराम चाटे तुरुंगा बाहेर



बीड /क्रांतिंवीर प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील एक आरोपी १४ महिन्यानंतर कारागृहाबाहेर येणार असल्याची माहिती मिळाली आहे. न्यायालयाने या आरोपीला तशी परवानगी दिली आहे. परंतु, याबाबत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी प्रतिक्रिया देताना यावर आक्षेप घेतल्याचे म्हटले जात आहे. सरपंच संतोष देशमुख प्रकरणातील एक महत्त्वाचा आरोपी जयराम चाटे तब्बल १४ महिन्यांनंतर काही तासांसाठी कारागृहातून बाहेर येणार आहे. त्याच्या धाकट्या भावाच्या निधनानंतर होणाऱ्या विधीस उपस्थित राहण्यासाठी न्यायालयाने त्याला पोलीस बंदोबस्तात जाण्याची परवानगी दिली आहे. जयराम चाटेचा धाकटा भाऊ श्रीराम चाटे याचे २ मार्च रोजी निधन झाले. बाराव्याच्या विधीस उपस्थित राहण्यासाठी जयराम चाटेच्या वकिलांनी न्यायालयात विशेष परवानगी मागितली होती.

### कृष्णा आंधळे अजूनही मोकाट

या हत्या प्रकरणातील एकमेव फरार आरोपी कृष्णा आंधळे हा अद्याप पोलिसांच्या हाती लागला नाही. संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी दावा केला आहे की, कृष्णा आंधळे हा आतापर्यंत तीन वेळा आपल्या गावी येऊन गेला आहे. याबाबतची माहिती त्यांनी उखऊ ला दिल्याचेही त्यांनी सांगितले. धनंजय देशमुख यांच्या माहितीनुसार, कृष्णा आंधळे मोबाईल वापरत नसल्याने त्याचे लोकेशन शोधणे अवघड जात आहे. पोलिसांचे खबऱ्यांचे जाळे या प्रकरणी प्रभावीपणे वापरले जात नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

**न्यायालयाकडून एक दिवसाची मुभा !**

**पोलीस बंदोबस्तात भावाच्या बाराव्याला राहणार उपस्थित !**

**धनंजय देशमुख यांनी केला प्रश्न उपस्थित !**


**तब्बल १४ महिन्यानंतर जयराम चाटे तुरुंगाबाहेर!**

**कृष्णा आंधळे अजूनही मोकाट ; न्यायव्यवस्थेवर विश्वास असल्याचा धनंजय देशमुख यांचा दावा!**

**धनंजय देशमुख यांची सुटकेवर हरकत :** दुसरीकडे, मृत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी कोर्टाच्या या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. धार्मिक विधीच्या वेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर त्याची जबाबदारी कोण घेणार? असा सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे. आरोपीचे नातेवाईक वारल्याचा अर्ज कोर्टात आला आहे. वकील उज्वल निकम यांनी या प्रकरणी कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त केली आहे. हे प्रकरण अत्यंत संवेदनशील आहे. आरोपी किती खालच्या पातळीचे आहेत हे सर्वश्रूत आहे. त्यामुळे या प्रकरणी काही कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला, तर त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. त्यांनी या प्रकरणी सर्व जबाबदारी पोलिस प्रशासनावर टाकून कोर्टाने आदेश द्यावेत अशी मागणी केली आहे.



**मुंबई : शेतकरी कामगार पक्षाचे नेते आमदार डॉ बाबासाहेब देशमुख यांची आमदार भवन येथे सदिच्छा भेट घेतली, यावेळी राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य भाई मोहन गुंड, भाई रामदास जराते, रस्ते महामार्ग शेतकरी शेतमजूर आघाडीचे प्रदेशाध्यक्ष दिगंबर कांबळे इतर उपस्थित होतो. जेव्हा परिवारातील सदस्य सारख एखादा आमदार जवळ घेऊन बसतो त्यावेळी चळवळीच्या कार्यकर्त्याच मन भरून येतं, भाई गणपतराव देशमुख आबांची कॉपी छबी पुर्ण बाबासाहेब देशमुख यांच्यात बघाय मिळाली.**



**अलिबाग: शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या चित्रलेखा पाटील यांची शेतकरी भवन येथे सदिच्छा भेट घेतली, यावेळी राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य भाई मोहन गुंड, भाई रामदास जराते, रस्ते महामार्ग शेतकरी शेतमजूर आघाडीचे प्रदेशाध्यक्ष दिगंबर कांबळे इतर उपस्थित होतो.**



# भारत टी-२० मध्ये तिसऱ्यांदा विश्वविजेता, न्यूझीलंडला हरवले

## सलग २ विश्वचषक जिंकणारी पहिली टीम, पहिल्यांदाच यजमान संघाने विजेतपद पटकावले

अहमदाबाद/क्रांतिंवीर प्रतिनिधी

टी-२० वर्ल्ड कप सुरू होण्यापूर्वी, भारताचे माजी कर्णधार रोहित शर्मा यांची एक जाहिरात आली. यात रोहित असे म्हणताना दिसले- 'टीम इंडिया हिस्ट्री रिपीट भी करेगी और टीम इंडिया हिस्ट्री डिफीट भी करेगी।' सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने ८ मार्च रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये न्यूझीलंडला ९६ धावांनी हरवून इतिहास पुन्हा घडवला आणि इतिहासाला हरवलेही.

रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने २८ जून २०२४ रोजी टी-२० विश्वचषकाचे विजेतपद पटकावले होते. संघाने बार्बाडोसमध्ये दक्षिण आफ्रिकेला ७ धावांनी हरवले होते. आज टीम इंडियाने टी-२० विश्वचषक जिंकण्याचा पराक्रम २०२६ मध्येही पुन्हा केला आहे.

या ऐतिहासिक अंतिम सामन्याची सुरुवात भारताला विश्वविजेता बनवणाऱ्या कर्णधारांनी केली. जेव्हा २००७ चे विश्वविजेते कर्णधार एम.एस. धोनी आणि २०२४ चे विश्वविजेते कर्णधार रोहित शर्मा ट्रॉफी घेऊन आले. सामन्याचा टॉस न्यूझीलंडने जिंकला आणि कर्णधार मिचेल सँटनरने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण, भारतीय ओपनर्सनी पॉवरप्लेमध्ये सँटनरचा निर्णय चुकीचा ठरवला. संजू सॅमसन आणि अभिषेक शर्माच्या जोडीने पॉवरप्लेच्या ६ षटकांत एकही विकेट न गमावता ९२ धावा केल्या. जो टी-२० विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वात मोठा पॉवरप्ले स्कोर आहे. एकेकाळी असे वाटत होते की भारतीय संघ २० षटकांत ३०० धावांचा टप्पा पार करेल. मात्र, १६वे षटक घेऊन आलेल्या जिमी नीशमने एका षटकात ३ बळी घेऊन रन रेटला ब्रेक लावला. त्याने पहिल्या चेंडूवर संजू सॅमसनला (८९ धावा), पाचव्या चेंडूवर ईशान किशनला (५४ धावा) आणि शेवटच्या चेंडूवर कर्णधार सूर्यकुमार यादवला (शून्य) पॅव्हेलियनमध्ये पाठवले. पुढील २४ चेंडूंमध्ये फक्त २८ धावाच झाल्या. त्यानंतर शिवम दुबेने २०व्या षटकात ३ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने २४ धावा केल्या आणि टीम इंडियाचा स्कोर २५५ धावांपर्यंत पोहोचवला. टी-२० विश्वचषक अंतिम सामन्याच्या इतिहासातील ही सर्वात मोठी धावसंख्या आहे.

# संपादकीय

## आखातातील युद्धाची जगाला झळ

इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर हल्ला चढवून मध्यपूर्वेत युद्धाला तोंड फोडले. आपल्यावर हल्ला होईल याची कल्पना इराणला होतीच. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जूनमध्येच इराणला तशी धमकी दिली होती. तरीही इराणचे नेतृत्व याबाबतीत गाफील राहले. इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर हल्ला करण्याची फुलप्रुफ योजना बनवली होती. या योजनेची इराणच्या गुप्तचर यंत्रणेला कुठलीही माहिती मिळाली नाही. हे इराणच्या गुप्तचर यंत्रणेचे अपयशच म्हणावे लागेल. त्याची मोठी किंमत त्यांना मोजावी लागली. इराणचे सर्वोच्च नेते आयातूला खामेनी आणि त्यांचे अनेक विश्वासू लष्करी अधिकारी एकाच वेळी मारले गेले. खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराण आपल्याला सहज शरण येईल असे अमेरिकेला वाटले पण झाले उलटेच. खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराण पेटून उठला. अमेरिकेला शरण जाण्यापेक्षा त्यांनी स्वाभिमानाने त्यांच्याशी लढण्याचे ठरवले. इस्रायल आणि अमेरिकेला जशास तसे उत्तर देण्याचे ठरवून त्यांनी इस्रायलच्या प्रमुख शहरांना लक्ष केले इतकेच नाही तर आखातात ज्या ज्या देशात अमेरिकेचे लष्करी तळ आहेत तिथे हल्ले सुरू केले. त्यामुळे युद्धाची व्याप्ती वाढली. अमेरिका आणि इस्रायलनेही इराणच्या तेहरानसह प्रमुख शहरांना लक्ष करून क्षेपणास्त्रांचा मारा सुरू ठेवला तरीही इराणने माघार घेतली नाही. खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराण शरण येईल आणि आपला सहज विजय होईल अशा आविर्भावात असलेल्या इराण आणि इस्रायलला आठवडा होत आला तरी हे युद्ध थांबवता आले नाही उलट युद्धाची व्याप्ती वाढली. ती इतकी वाढली की खुद्द डोनाल्ड ट्रम्प यांना हे युद्ध आणखी तीन ते चार आठवडे चालेल असे सांगावे लागेल. जर हे युद्ध आणखी तीन ते चार आठवडे चालले तर त्याची झळ केवळ या तीन देशांना किंवा आखातातील देशांनाच बसेल असे नाही तर संपूर्ण जगाला याची झळ बसेल . त्याची सुरुवातही झाली आहे. इराणने इंधन वाहू जहाजांसाठी हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद केली आहे. या सामुद्रधुनीतून फक्त चीनच्या जहाजांना जाण्यास परवानगी असल्याचे इराणने म्हटले आहे इतर देशांच्या जहाजांनी जर या सामुद्रधुनीत प्रवेश केला तर तर जहाजांवर हल्ला करेल अशी धमकी इराणने दिली आहे. हॉर्मुझची सामुद्रधुनी इंधन वाहतूक करणाऱ्या जहाजांसाठी खूप महत्वाची सामुद्रधुनी आहे. आखाती देशातून इतर देशांना होणारा तेलपुरवठा याच समुद्रधुनीतून होतो ते जर ही सामुद्रधुनी बंद झाली तर संपूर्ण जगात इंधनाचा मोठा तुटवडा निर्माण होईल परिणामी संपूर्ण जगावर मोठे संकट कोसळेल. हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून दररोज दोन कोटी बॅरल इंधनाची वाहतूक केली जाते. तसेच कतार आणि यूएइ या अरब देशातून नैसर्गिक वायूची निर्यात देखील केली जाते. इराणच्या या कारवाईमुळे या सागरी क्षेत्रातून होणारी इंधनाची वाहतूक खंडित झाली असून जागतिक पुरवठा साखळी संकटात सापडली आहे. गेल्या आठवड्यात आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनाचे दर ७२ डॉलर इतके होते आता ते ८१ डॉलर पर्यंत पोहचले सर जर हे युद्ध आणखी काही दिवस असेच सुरू राहिले तर आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनाचे दर प्रति बॅरल २०० डॉलरवर पोहोचतील असे जाणकार सांगत आहेत. याचाच अर्थ हे युद्ध जरी आखातात सुरू असले तरी त्याची झळ संपूर्ण जगाला बसू शकते. तेलाचे दर वाढले की महागाई वाढते हे असे अर्थशास्त्र सांगते त्यामुळे भविष्यात महागाईचा आगडोंब उसळू शकतो याचा फटका सर्वसामान्य जनतेलाच बसणार आहे. त्यामुळे हे युद्ध लवकरात लवकर संपणे हेच जगाच्या हिताचे आहे. हे युद्ध लवकर संपावे यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाने प्रयत्न करायला हवेत. युद्ध थांबवण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने हस्तक्षेप करायला हवा. संयुक्त राष्ट्रसंघाने शांतीसेना पाठवून हे युद्ध रोखायला हवे. हे युद्ध जर वेळीच थांबले नाही तर कदाचित जग तिसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटले जाईल आणि त्यात संपूर्ण जग होरपळून निघेल.

# स्त्री उभी राहिली की समाज उभा राहतो



समाजाच्या प्रगतीची उंच इमारत आपण अभिमानाने दाखवतो; परंतु त्या भक्कम इमारतीचा पाया कोणी घातला, याचा विचार मात्र आपण किती वेळा करतो? इतिहासाच्या पानांवर नजर टाकली की एक सत्य ठामपणे समोर उभे राहते–ज्या क्षणी स्त्रीने स्वतःची ओळख पटवली, निर्भीडपणे उभी राहिली, त्या क्षणापासून समाजानेही आपल्या उज्वल भविष्याची वाटचाल सुरू केली.

स्त्री ही केवळ कुटुंबाची जबाबदारी सांभाळणारी व्यक्ती नाही; ती संस्कृतीची शिल्पकार आहे, मूल्यांची वाहक आहे आणि परिवर्तनाची निःशब्द क्रांती आहे. तिच्या सृजनशक्तीत घराची उब आहे, समाजाची चेतना आहे आणि राष्ट्राच्या प्रगतीची प्रेरणा आहे. तिच्या हसण्यात घराचा आनंद दडलेला असतो, तिच्या अश्रूंमध्ये समाजाची वेदना असते आणि तिच्या जिद्दीमध्ये भविष्यातील परिवर्तनाची ताकद सामावलेली असते.

इतिहास साक्ष देतो की जेव्हा स्त्रीने स्वतःच्या क्षमतेची जाणीव करून अन्यायाविरुद्ध उभी राहण्याचा निर्धार केला, तेव्हा समाजात मोठ्या प्रमाणावर परिवर्तन घडले. स्त्रीच्या जिद्दीने आणि चिकाटीने अनेक सामाजिक क्रांती घडून आल्या. तिचे सामर्थ्य केवळ तिच्या कष्टात नसून तिच्या संवेदनशील विचारांमध्ये आणि दूरदृष्टीत दडलेले आहे. एका स्त्रीची जागृती संपूर्ण युगाला दिशा देऊ शकते, कारण अंधारात आशेचा दीप पेटवण्याची अद्भुत शक्ती तिच्यामध्ये आहे.

जेव्हा स्त्री स्वतःला ओळखते, तेव्हा ती केवळ कुणाची मुलगी, पत्नी किंवा आई राहात नाही; ती एक विचार बनते, दिशा बनते आणि परिवर्तनाची ठिणगी बनते. त्या क्षणी ती नियतीशी संघर्ष करत नाही, तर स्वतःच्या अस्तित्वाचा स्वीकार करून मुक्तीचा मार्ग शोधते. म्हणूनच स्त्रीच्या शिक्षणामध्ये केलेली गुंतवणूक म्हणजे समाजाच्या भविष्यामध्ये केलेली गुंतवणूक होय. तिच्या सुरक्षिततेची हमी म्हणजे समाजाच्या नैतिकतेची हमी आहे आणि तिच्या आत्मसन्मानाचा आदर म्हणजे लोकशाहीचा खरा अर्थ आहे.भारतीय इतिहासात स्त्रीशक्तीची अनेक तेजस्वी उदाहरणे आपल्याला दिसतात. समाजाच्या तिरस्काराचे दगड आणि शेण अंगावर झेलतही मुलींच्या हातात पुस्तक देणाऱ्या सावित्रीबाई फुले यांनी भारतीय समाजाच्या नवजागरणाचा दीप प्रज्वलित केला. त्यांचे कार्य हे केवळ एका शाळेचे नव्हते, तर समाज परिवर्तनाच्या युगाची सुरुवात होती.त्याचप्रमाणे रमाबाई आंबेडकर यांनी संयम, त्याग आणि निःशब्द समर्पणाने बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय प्रवासात सावलीप्रमाणे साथ दिली. त्यांचा त्याग केवळ वैयक्तिक नव्हता; तो सामाजिक परिवर्तनाला बळ देणारा होता.

स्वराज्याच्या स्वप्नाला संस्कारांची धार देणाऱ्या जिजाबाई यांनी मातृत्वातून राष्ट्र घडवण्याचे कार्य केले. त्यांच्या संस्कारांतूनच शिवाजी महाराज यांसारखे अद्वितीय व्यक्तिमत्त्व घडले. शौर्याच्या रणांगणात ज्वालासारख्या प्रखर ठरलेल्या राणी लक्ष्मीबाई यांनी स्वाभिमानाचे जाज्वल्य उदाहरण घालून दिले. त्यांच्या तलवारीत केवळ युद्ध नव्हते, तर स्वातंत्र्याची जिद्द होती.

न्यायप्रियता आणि संवेदनशील प्रशासनाचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे अहिल्याबाई होळकर त्यांनी लोककल्याणकारी योजना, मंदिरांचे पुनरुज्जीवन आणि सुसंस्कृत प्रशासन घडवून लोकांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले.इतिहासाने आपल्याला दिशा दिली–सावित्रीबाई फुले यांचे शिक्षण, जिजाबाई यांचे संस्कार, राणी लक्ष्मीबाई यांचे शौर्य, अहिल्याबाई होळकर यांचे प्रशासन आणि रमाबाई आंबेडकर यांचा त्याग – या सर्वांचा अर्थ एकच आहे: स्त्री ही समाजाच्या प्रगतीची केंद्रबिंदू आहे.

आधुनिक काळातही स्त्रियांनी नव्या उंची गाठल्या आहेत. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी राजकारणावर आपला ठसा उमटवला. भारतातील पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांनी वैद्यकीय क्षेत्रात ऐतिहासिक दालन उघडले. ताराबाई शिंदे यांनी आपल्या लेखनातून स्त्रीवादी विचारांची पायाभरणी केली.आकाशाला स्पर्श करणाऱ्या कल्पना चावला प्रशासनात कडक शिस्त आणणाऱ्या किरण बेदी एव्हरेस्ट सर करणाऱ्या बचेंद्री पाल , अंतराळ मोहिमेत चमकलेल्या सुनिता विल्यम स्वरांनी भारतीय संगीताला जागतिक ओळख देणाऱ्या लता मंगेशकर आणि क्रीडा क्षेत्रात देशाचा आत्मविश्वास वाढवणाऱ्या पी टी उषा– या सर्वांनी स्त्रीच्या कर्तृत्वाची नवीन क्षितिजे उघडली.आज द्रौपदी मुर्मू राष्ट्रपती पद भूषवून देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदावर स्त्रीशक्तीचा गौरव वाढवत आहेत. त्यांच्या नेतृत्वातून आदिवासी समाज, शिक्षण, आरोग्य आणि विकासाच्या प्रश्नांना राष्ट्रीय स्तरावर नवी दिशा मिळत आहे.आज स्त्रीने शिक्षण, विज्ञान, साहित्य, प्रशासन, क्रीडा आणि राजकारण अशा प्रत्येक क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले आहे. तरीही काही ठिकाणी तिला दुय्यम स्थान दिले जाते, तिच्या स्वप्नांवर मर्यादा घालण्याचा प्रयत्न होतो. हे वास्तव बदलणे अत्यावश्यक आहे. कारण स्त्रीला संधी मिळाली तर ती केवळ स्वतःचे जीवन घडवत नाही; ती संपूर्ण समाजाचे भविष्य घडवण्याची ताकद ठेवते.

महिला दिनी भाषणे होतात, गौरव होतो, पुरस्कार दिले जातात; परंतु खरी गरज आहे ती मानसिकता बदलण्याची. स्त्रीचा सन्मान फुलांच्या गुच्छात नसून तिच्या स्वप्नांना आधार देण्यात आहे. जिथे स्त्रीचा सन्मान होतो, तिथे संस्कृती फुलते आणि समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करतो.म्हणूनच स्त्रीचे अस्तित्व मान्य करून तिला समाजात बरोबरीचे स्थान देणे आवश्यक आहे. तिच्या पंखांना नवे आकाश देणे ही काळाची गरज आहे. कारण स्त्री उभी राहिली की समाज केवळ उभा राहत नाही–तो उजळतो, बहरतो आणि उन्नत होतो.

महिला दिनाच्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!

लेखिका मनिषा आनंदराव कांबळे, यवतमाळ

# वंशाचा दिवा आणि बंदिस्त स्त्री



स्त्रीला पुरुषाचे आणि पुरुषाला स्त्रीचे आकर्षण असणे हे नैसर्गिक आहे.आकर्षणात गुरुत्वाकर्षणाचा गुणधर्म आहे,नियम आहे. विजातीय आकर्षण हा निसर्गनियम आहे. स्त्री आणि पुरुष एकजातीय नसून विजातीय आहेत,म्हणून त्यांच्यात आकर्षणाचे तत्व समाविष्ट आहे. स्त्री ही एक जात आहे आणि पुरुष ही दुसरी जात आहे.मानवप्राण्याच्या या दोन जाती आहेत,स्त्री आणि पुरुष.या पेक्षा मानवी समूहात जैविक जात तिसरी नाहीच.सामाजिक क्षेत्रात अनेक ज्या जाती केल्या गेल्या त्या त्यांच्या व्यवसायानुसार केल्या गेल्या.त्यांच्यात रोटी बंदी आणि बेटी बंदीचा कायदा करण्यात आला,म्हणून हजारो जातीचा कप्पेबंद मानवी समाज निर्माण झाला.या जातिव्यवस्थे ची समाजव्यवस्था म्हणतात.

वंशाला दिवा पाहिजे,हा विचार का बळावला ? याचे कारण कुटुंब व्यवस्था होय.कुटुंबव्यवस्था साठी विवाह किंवा लग्न ही संकल्पना पुढे आली.मग लग्न कुणाशी तर आपल्याच वंशाच्या लोकांशी म्हणजे जातीशी,एक जात म्हणजे एक वंश च होय.आज आडनाव हा एक वंश असला तरी,अनेक आडनावे ही एकाच जातीची आहेत,याचा अर्थ त्या जातीचा वंश एकच आहे.एक रक्तगट म्हणजे एक वंश. एकाच रक्तगटाची अनेक आडनावे,जाती आहेत. खरेतर सायन्स असे सांगते की, एकाच रक्तगटापासून निर्माण झालेली संतती ही सुदृढ सशक्त नसते,ती विशुद्ध असते,त्यात अनेक दोष असतात.( गुणात्मक दोष ). असे असले तरी आम्हाला आमच्याच जातीचा,कुटुंबाचा वंश हवा असतो,हे एक प्रकारचे अद न्यानच म्हटले पाहिजे.असो. ही झाली शास्त्रीय चर्चा.

आता वंशाच्या दिव्याच्या आग्रह का? तर याचे मुख्य कारण म्हणजे आपल्या कुटुंबाला इतरकुटुंबाचे नाव लागू नये.आपला वारसदार हा आपल्या पासूनच निर्माण झालेला हवा,हा आग्रह.आणि समज,आणि या समजला मान्यता.

आपल्या कुटुंबाचा वंशज आपलाच हवा,याची खात्री होण्यासाठी मग स्त्रीपुरूष यांनी एकमेकांच्या बंधनात असणे जरूरी आहे,असे बंधनात राहायचे तर त्यावर उपाय म्हणजे लग्न करणे.लग्न म्हणजे लगन.संलग्न,एकत्र राहणे.एकमेकाशी एकनिष्ठ राहणे,बाहेरख्यालीपणा न करणे. एकमेकाशी बांधून घेणे.बंदिस्त होणे,बंदिस्त जीवन जगणे.कुटुंबात स्वातंत्र्य नसणे. पारतंत्र्यात जीवन जगणे.परावलंबी जीवन जगणे,परस्परांवर अवलंबून असणे,आपली शारीरिक मानसिक गरज ही फक्त एकाच व्यक्तिपासून मिळविणे, ती पूर्ण नाही होऊ शकली, तरी नाईलाज म्हणून,दैव म्हणून,सामाजिक बंधन म्हणून,पावित्र्य जपणे म्हणून गुपचुप सहन करणे.यातूनच पावित्र्याची संकल्पना, पतिव्रता , सती,आणि सतीची परंपरा रूढ झाली.यातून पुरुषसत्ताक कुटुंब पद्धत असल्यामुळे पुरुषास सूट मिळाली,परंतु पवित्र्याच्या या बंधनात स्त्री मात्र अडकून पडली.

माझ्या पासून झालेले मूल हे माझेच आहे,हे सिद्ध करणे म्हणजे वंशाचा दिवा होय.आणि हा दिवा माझाच आहे,यासाठी विवाहाची तरतूद,परंपरा ,नियम ,कायदा निर्माण झाला.वंशाचा दिव्याच्या नियमाचे काटेकोर पालन करणे हे आद्यकर्तव्य स्त्रीचेच ठरविण्यात आले.ते कर्तव्य पार पाडण्यासाठी त्या कर्तव्यास पावित्र्याचे बंधन स्त्रीवरच टाकण्यात,लादण्यात आले.आपण ज्याच्याशी लग्न केलंय त्या पुरुषाशिवाय अन्य पुरुषाशी संबंध ठेवला तर त्यापासून झालेले मूल हे आपल्या वंशाचा दिवा होऊ शकत नाही,अशी एक समाज मान्यता रुढ झाली. ( दत्तक पुत्र चालते ही त्यास पळवाट पण काढली ) दत्तक पुत्र हा तर दुसऱ्याचे मुल असते,हे चालते,मग आपल्या स्त्रीच्या गर्भात दुसऱ्याचे मुल चालत नाही,हा दुटप्पीपणा पुरुष वर्गाने स्त्रीवर लादला,आणि तिला बंदिस्त केले. माझ्या शरीरावर माझा हक्क असला पाहिजे,या ऐवजी माझ्या शरीरावर विवाहाचे बंधनाने एखाद्या पुरुषाचा हक्क प्रस्थापित होणे,इथेच स्त्रीने आपले स्वातंत्र्य गमावले.

खरे तर कुटुंब,म्हणजेच दोन विरुद्ध लिंगी व्यक्ती म्हणजे स्त्रीपुरुष हे विवाहबद्ध होऊन सहयोगी म्हणून एकत्र राहणे, मुले आईवडील यांची काळजी घेणे,त्यांचे भरणपोषण,संरक्षण करणे हे मुख्य कर्तव्य दोघांचेही असते,याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही,परंतु केवळ लग्न केले म्हणून स्त्रीवर पावित्र्याचे बंधन,नैतिकतेचे बंधन टाकणं म्हणजे तिचे किंवा त्याचे व्यक्ती स्वातंत्र्य,विचार स्वातंत्र्य हिरावून घेणे होय,बंधन म्हणजे गुलामीच होय.ही गुलामी केवळ वंशाच्या दिव्याच्या चुकीच्या संकल्प ने मुळे,चुकीच्या विचारामुळे आणि मालकी हक्काच्या विचारामुळे आली.

आजही स्त्री नवऱ्याला मालक म्हणते,आणि नवरा बायकोला मालकीण म्हणून संबोधतो,नव्हे ही मान्यताच आहे. ही मान्यता म्हणजेच मालक गुलामाची व्यवस्था मान्य करणे होय.स्वातंत्र्य त्यालाच म्हणतात,ज्यात कुणी कुणाचा मालक नसतो आणि कुणी कुणाचा गुलाम नसतो.

विवाह ,लग्न ही व्यवस्था एकत्र राहणे,सहजीवन जगणे,एकमेकांची सुखदुःखे सांभाळणे,मुलांचे भविष्य घडविणे,मालमत्ता सुरक्षित ठेवणे इत्यादी साठी ठीक आहे,परंतु विवाहामुळे व्यक्तिस्वातंत्र्यावर स्वतःच्या शरीरावर ,मनावर जर कुटुंबातील लोकांचा दबाव असणार असेल,आणि पवित्र्याच्या , देवाच्या,धर्माच्या नावाखाली नवरा किंवा बायको दबून जात असतील,गुदमरून मरनार असतील,तर अशा जीवनपद्धती ला अर्थ काय ? अशी जीवनपद्धत निरर्थक,अयोग्य, अन्यायीच म्हटली पाहिजे.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने हे विचार सुचले,कदाचित रूढीप्रिय विचारवंतांना वाचकाना हे रुचणार नाहीत, पचनार तर नक्कीच नाहीत,हे माहीत असूनही आपण या विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि २१ व्या प्रगत जगात वावरताना हे विद्रोही विचार म्हणून यावर विचार व्हावा, एव्हढीच अपेक्षा,या विचारामुळे स्त्रीमुक्ती होईल असा भाबडा विचार.

लेखक
दत्ता तुमवाड
९४ २० ९१२२ ०९

# जत्तिक महिला दिन

दरवर्षी आठ मार्चला म्हणजेच जागतिक महिला दिन साजरा केला. जातो यावर्षी तो रविवारी साजरा केला जाईल महिला सर्व क्षेत्रा अग्रेसर होत आहेत आता महिलांना समाजात महत्त्वाचं स्थान मिळत आहे मात्र पूर्वीच्या काळी असे नव्हतं म्हणून या दिवसाला खूप महत्त्व आहे चला जाणून घेऊया जागतिक महिला दिन का साजरा केला जातो.

जागतिक महिला दिन हा काम शिक्षण राजकारण आणि संस्कृतीसह जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये महिला आणि मुलींच्या कामगिरीची ओळख आणि प्रशंसा करण्याचा दिवस आहे महिला चा समान हक्क आणि न्याय संधीच्या गरजे बद्दल बोलण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा मानला जातो.

गेल्या काही वर्षात हा दिवस केवळ सेलिब्रेशन साठी नव्हे तर चळवळीसाठीही ओळखला जाऊ लागला आहे या दिवसाच्या निमित्ताने हे अधोरेखित केले जात महिलांची प्रगती झाली असली तरी अजूनही खूप काम बाकी आहे आणि गट या दिवसाचा वापर बदलासाठी आणि त्यांच्या समुदायातील महिलांना पाठिंबा देण्यासाठी करतात

महिला दिनांना प्रत्येक महिला वेगवेगळ्या पद्धतीने साजरा करते मात्र आपला प्रश्न हा आहे की महिला दिन ८ मार्चला का साजरा केला जातो या दिवशी असं काय झालं होतं.आंतरराष्ट्रीय महिला दिन १९०० च्या दशकाच्या सुरुवातीपासून साजरा केला जात आहे त्यावेळी अनेक महिला गरीब परिस्थितीत कमी पगारावर जास्त तास काम करायच्या एका काळानंतर त्यांनी निषेध करण्यास सुरुवात केली आणि कमी कामाचे तास योग्य वेतन आणि मतदानाचा अधिकार यासह चांगल्या उपचाराची मागणी केली.राष्ट्रीय महिला दिनाची स्थापना प्रथम १९१० मध्ये अमेरिकेच्या सोशालिस्ट पार्टीने केली त्यानंतर लवकरच ऑस्ट्रेलिया डेन्मार्क जर्मनी आणि स्वित्झर्लंड सारख्या देशांनी १९११ मध्ये हा दिवस साजरा करण्यास सुरुवात केली.संयुक्त राष्ट्राने १९७५ मध्ये अधिकृतपणे अंतरराष्ट्रीय महिला दिनाला मान्यता दिली १९७७ मध्ये महिला हक्क आणि आंतरराष्ट्रीय शांततेला प्रोत्साहन देण्यासाठी ८ मार्च हा दिवस स्वीकारण्यात आला तेव्हापासून हा दिवस एक जागतिक कार्यक्रम बनला आहे. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महिलांना समान वेतन शिक्षण सुरक्षितता मिळावी आणि महिलांवरील हिंसाचार संपवणे यासारख्या मुद्द्याबद्दल जागरूकता निर्माण करण्यात येते या महिलांनी त्यांच्या कुटुंबात कामाच्या ठिकाणी आणि समुदायात बदल घडवून आणला आहे त्यांच्या सन्मानासाठी ही हा दिवस साजरा केला जातो.



# चांदापूर येथे आरोग्य भवानी – डोंगरतुकाई मंदिर परिसरात गित्ते परिवाराच्या पुढाकारातून उभे राहिले

# प्रति शिर्डी म्हणून उभारले भव्य श्री साईबाबा मंदिर

## श्री.साईबाबा मंदिर येथे आ.धनंजय मुंडे यांची सदिच्छा भेट; मंदिर परिसराची केली पाहणी

## संत-महंत, मंत्री विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत श्री साईबाबा प्राणप्रतिष्ठा सोहळा; भाविकांमध्ये उत्साह

### परळी वैद्यनाथ नगरीत 'ओम साईराम'च्या जयघोषात साईबाबांच्या मूर्ती दाखल

■ परळी वैद्यनाथ/प्रतिनिधी

गेवराई परळी वैद्यनाथ नगरीत उभारण्यात येत असलेल्या भव्य दिव्य प्रति शिर्डी श्री साईबाबा मंदिराच्या मुर्ती प्राणप्रतिष्ठ सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्याचे मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी चांदापूर येथे प्रति शिर्डी मंदिर म्हणून ओळखळल्या जाणाऱ्या श्री साई मंदिराला सदिच्छा भेट देऊन मंदिर परिसराची पाहणी केली. यावेळी मंदिर परिसरात सुरू असलेल्या तयारीचा आढावा घेत भाविकांसाठी करण्यात येत असलेल्या सुविधांबाबतही माहिती घेतली.

प्रति शिर्डी मंदिर म्हणून ओळखळल्या जाणाऱ्या श्री साई मंदिर येथे मुर्ती प्राणप्रतिष्ठ सोहळ्यास संत महंत, मंत्री तसेच सर्व क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित राहणार असून सोहळा अत्यंत भव्य दिव्य पद्धतीने पार पाडण्यासाठी जय्यत तयारी सुरू आहे. मंदिर परिसरात वॉटरप्रूफ मंडप, पार्किंगची सुविधा, तसेच कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे. या सोहळ्यात राज्यातील मंत्री तसेच विविध क्षेत्रातील संत–महंतांच्या उपस्थितीत हरीनामाचा गजर होणार असून महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकारांचा सहभाग देखील राहणार आहे.

परळी वैजनाथ तालुक्यातील चांदापूर येथे आरोग्य भवानी – डोंगरतुकाई मंदिर परिसरात गित्ते परिवाराच्या वतीने भव्य प्रति शिर्डी मंदिर म्हणून ओळखळल्या जाणाऱ्या श्री साईबाबा मंदिर साकारण्यात आले आहे. या मंदिराचा मुर्ती प्राणप्रतिष्ठ कलशारोहण सोहळा लवकरच होणार असून परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, परळी वैद्यनाथ नगरीत श्री साईबाबांच्या पावन मूर्तीचे भक्तिमय वातावरणात आगमन झाले. ङ्गओम साईरामः ओम साईरामःङ्क या जयघोषाने संपूर्ण वैद्यनाथ नगरी दुमदुमून गेली. श्री साईबाबांच्या मूर्तीचे शहरातील लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे चौक (रिलायन्स पेट्रोल पंप जवळ) येथे आगमन झाले. या पावन प्रसंगी श्री साईबाबांच्या मूर्तीचे विधीवत पूजन व आरती करून भव्य दिव्य स्वागत करण्यात आले. लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे चौक (रिलायन्स पेट्रोल पंप जवळ), राणी लक्ष्मीबाई चौक (टॉवर), उखळवेस गल्ली,नगरध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी यांचे निवासस्थान, चांदापूर – श्री साईबाबा मंदिर अशा प्रमुख मार्गांवरून शोभायात्रा व नगर प्रदीक्षणा काढून मूर्तीचे भव्य आगमन करण्यात आले.

परळी वैद्यनाथ शहरापासून बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथांच्या पावन नगरीपासून काही अंतरावर निसर्गाचे वरदान लाभलेल्या परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे चांदापूर येथे आरोग्य भवानी – डोंगरतुकाई मंदिर परिसरात गित्ते परिवाराच्या वतीने भव्य श्री साईबाबा मंदिर साकारण्यात येत आहे. या मंदिरासाठी जयपूर येथील सुप्रसिद्ध मूर्तीकार पांडे यांच्याकडून अत्यंत देखणी, मनमोहक व आकर्षक संगमरवरी श्री साईबाबांची मूर्ती साकारण्यात आली आहे. येत्या १५ मार्च रोजी या मूर्तीची विधीवत प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होणार असून पंचक्रोशीतील भाविकांना 'श्रद्धा आणि सबुरी'चा संदेश देणाऱ्या श्री साईबाबांच्या दर्शनाचा लाभ घेता येणार आहे, अशी माहिती उद्योजक रवींद्र (पापा) गित्ते व परळी वैजनाथ नगर परिषदेचे पाणी पुरवठा सभापती जयश्रीताई रवींद्र गित्ते यांनी दिली.



यावेळी उद्योजक रवींद्र पापा गित्ते, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी, भावड्या कराड, भागवत मुंडे, बालाजी गित्ते, संदिप गित्ते, प्रा. पी. एल. कराड, मुंडे, प्रविण पवार, मोहन व्हावळे, महादेव गित्ते आदी उपस्थित होते. चांदापुर येथे उभारलेले प्रति शिर्डी म्हणून ओळखले जाणारे भव्य श्री साईबाबा मंदिर हे पंचक्रोशीतील भाविकांसाठी मोठे श्रद्धास्थान ठरणार आहे. गित्ते परिवाराने केलेले हे कार्य अत्यंत कौतुकास्पद असून येथे होणारा मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडेल. या मंदिरामुळे भाविकांना 'श्रद्धा आणि सबुरी'चा संदेश मिळत राहील अशी प्रतिक्रिया आ. धनंजय मुंडे यांनी दिली.

चांदापूर येथे साकारण्यात आलेले श्री साईबाबा मंदिर हे भाविकांच्या सेवेसाठी उभारले आहे. जयपूर येथून आणलेल्या संगमरवरी साईबाबांच्या मूर्तीची लवकरच विधीवत प्राणप्रतिष्ठा होणार असून या सोहळ्यास संत–महंत आणि मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. पंचक्रोशीतील भाविकांना साईबाबांच्या दर्शनाचा लाभ मिळावा, हीच आमची भावना आहे. अशी प्रतिक्रिया उद्योजक रवींद्र पापा गित्ते यांनी दिली.

चांदापूर येथे उभारलेले भव्य श्री साईबाबा मंदिर हे परिसराच्या धार्मिक वैभवात भर घालणारे ठरेल. या मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. गित्ते परिवार व भाविकांच्या सहकार्याने हा सोहळा अत्यंत भव्य दिव्य होणार आहे. अशी प्रतिक्रिया माजी नगरध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी यांनी दिली.

# योगेश्वरी पॉलिटेक्निकमध्ये राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात

अंबाजोगाई। प्रतिनिधी

येथील कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक या विभागामध्ये दिनांक ६ व ७ मार्च रोजी इंटर इंजिनिअरिंग डिप्लोमा स्टुडंट्स स्पोर्ट्स असोसिएशन अंतर्गत महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ संलग्न संस्थांमधील पॉलिटेक्निकमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय चेस व कॅरम या क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या स्पर्धेचे उदघाटन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे संचालक तसेच पॉलीटेक्निक विभागाचे प्रभारी प्रताप पवार यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

यावेळी प्रताप पवार यांनी विद्यार्थ्यांना विविध क्रीडा प्रकारांचे अभियांत्रिकी शिक्षणात महत्त्व सांगून शुभेच्छा दिल्या. स्पर्धेसाठी उपस्थित विविध महाविद्यालयांच्या क्रीडा



प्रमुखांना सन्मानित करण्यात आले.प्रास्तविक प्राचार्य डॉ.रमण देशपांडे यांनी तर संचलन डॉ.संकेत तोरंबेकर,आभार अतूल फड यांनी मानले.विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल यो.शि.संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, सचिव कमलाकर चौसाळकर यांच्यासह विभागप्रमुख प्रा.रोहित कदम,प्रा.नारायण सिरसाट,प्रा.अतुल फड, प्रा.श्याम गडदे प्रा.बप्पासाहेब सोनवणे इतर कर्मचारी आदींनी अभिनंदन केले आहे.

# आदर्श टोकवाडी ग्रामपंचायतीत माहिती अधिकार कायद्याची पायमल्ली?

## माहिती आयुक्तांनी दंड ठोठावूनही परिस्थिती जैसे थे

■ टोकवाडी/प्रतिनिधी




पारदर्शक कारभारासाठी अत्यंत महत्वाचा मानला जाणारा माहितीचा अधिकार कायदा (ठढख) टोकवाडी येथील आदर्श ग्रामपंचायतीत मात्र पायदळी तुडवला जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. गावातील काही सजग नागरिकांनी विविध विकासकामे, निधी खर्च व प्रशासकीय निर्णयांबाबत माहितीच्या अधिकारातून माहिती मागितली असता ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकारी मॅडम यांच्याकडून वेळेत माहिती दिली जात नसल्याची गंभीर तक्रार समोर येत आहे.

माहिती अधिकार कायद्यानुसार अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत माहिती देणे बंधनकारक असतानाही संबंधित अधिकाऱ्यांकडून नागरिकांना वारंवार टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. त्यामुळे काही नागरिकांना माहिती मिळवण्यासाठी थेट माहिती आयोगाची दारं ठोठावावी लागली.

दरम्यान, अशाच एका प्रकरणात संभाजीनगर येथील विभागीय माहिती आयुक्तांनी ग्रामविकास अधिकारी यांच्यावर १० हजार रुपयांचा दंड ठोठावला होता. मात्र दंडाची कारवाई होऊनही ग्रामपंचायत प्रशासनाच्या कार्यपद्धतीत कोणताही बदल झालेला दिसत नसल्याने माहिती अधिकार कायद्याची उघडपणे पायमल्ली होत असल्याची चर्चा गावात सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीचा कारभार पारदर्शक व्हावा, माहिती अधिकार कायद्याची काटेकोर अंमलबजावणी व्हावी आणि नागरिकांना वेळेत माहिती मिळावी, अशी मागणी टोकवाडीतील ग्रामस्थांकडून जोर धरू लागली आहे.या अधिकारी आणि प्रशासनाच्या चुकीच्या वागण्यामुळे गावाचे नाव बदनाम होऊ लागले आहे.

# इराण-इस्रायल संघर्षाचा बाजारावर परिणाम; परदेशी गुंतवणूकदारांनी चार दिवसांत काढले 21 हजार कोटी

■ मुंबई / प्रतिनिधी

मध्य पूर्वेतील वाढत्या लष्करी तणावाचा परिणाम आता जागतिक बाजारपेठेसह भारतीय शेअर बाजारावरही स्पष्टपणे दिसू लागला आहे. इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्यांमुळे या प्रदेशातील परिस्थिती अधिक तणावपूर्ण बनली असून त्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या आठवड्यात देशांतर्गत शेअर बाजारात मोठी घसरण नोंदवली गेली. या अस्थिर वातावरणाचा सर्वाधिक परिणाम परदेशी गुंतवणूकदारांच्या निर्णयांवर दिसून आला. आकडेवारीनुसार, गेल्या आठवड्यातील केवळ चार व्यापार सत्रांमध्ये परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी (एफपीआय) भारतीय बाजारातून सुमारे २१ हजार कोटी रुपयांची रक्कम काढून घेतली. बाजारातील घसरणीदरम्यान एफपीआयंनी मोठ्या प्रम ाणावर शेअर्सची विक्री केल्याचेही समोर आले आहे.

विशेष म्हणजे, याच आधी काही काळापूर्वी परदेशी गुंतवणूकदार भारतीय बाजाराबाबत सकारात्मक दिसून येत होते. फ ेब्रुवारी महिन्यात त्यांनी सुमारे २२,६१५ कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती. ही गुंतवणूक मागील १७ महिन्यांतील एका महिन्यातील सर्वात मोठी खरेदी मानली जात होती. मात्र मध्य पूर्वेतील वाढत्या तणावानंतर बाजारातील परिस्थिती झपाट्याने बदलताना दिसत आहे.

मागील काही महिन्यांचा विचार केला तर परदेशी गुंतवणूकदारांकडून भारतीय शेअर बाजारात सातत्याने विक्री होत असल्याचे दिसून येते. डिपॉझिटरीच्या आकडेवारीनुसार,



जानेवारी महिन्यात एफपीआयंनी सुमारे ३५,९६२ कोटी रुपयांचे शेअर्स विकले होते. त्यानंतर डिसेंबरमध्ये हा आकडा सुमारे २२,६११ कोटी रुपयांपर्यंत होता. यापूर्वी नोव्हेंबर महिन्यातही परदेशी गुंतवणूकदारांनी सुमारे ३,७६५ कोटी रुपयांचे शेअर्स विकले होते.

ताज्या आकडेवारीनुसार, २ ते ६ मार्च या कालावधीतही परदेशी गुंतवणूकदारांनी रोख बाजारात सुमारे २१ हजार कोटी रुपयांचे शेअर्स विकले. त्यामुळे अल्पावधीतच भारतीय बाजारातून मोठ्या प्रमाणावर भांडवल बाहेर गेल्याचे स्पष्ट झाले आहे. बाजारातील तज्ज्ञांच्या मते, पश्चिम आशियातील वाढत्या भू–राजकीय तणावामुळे परदेशी गुंतवणूकदार सध्या सावध भूमिका घेत आहेत आणि जोखीम टाळण्याचा प्रयत्न करत आहेत.

दरम्यान, अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या संयुक्त लष्करी कारवाईनंतर इराणकडूनही प्रत्युत्तरात्मक हल्ले करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण पश्चिम आशियामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या परिस्थितीमुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता वाढली असून त्याचा परिणाम भारतीय शेअर बाजारावरही दिसून आला आहे.

गेल्या आठवड्यात देशांतर्गत शेअर बाजारात झालेल्या घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे अल्पावधीत लाखो आणि कोट्यवधी रुपये बुडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. वाढती जागतिक अनिश्चितता आणि भू–राजकीय तणाव यामुळे पुढील काळातही बाजारातील चढ–उतार कायम राहण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

## महिलांनी सेंद्रिय शेतीकडे वळणे ही काळाची गरज" : डॉ. माधुरी रेवणवार

# महिला सक्षमीकरणाचा संदेश देणारा माजलगाव विकास प्रतिष्ठानचा महिला मेळावा उत्साहात

■ माजलगाव/प्रतिनिधी

महिलांनी आधुनिक ज्ञान आणि विज्ञानाच्या आधारे शेती व सामाजिक कार्यात पुढे येणे आवश्यक आहे. सेंद्रिय शेतीसारख्या उपक्रमांद्वारे महिलांनी स्वावलंबी होत समाजाच्या प्रगतीत योगदान द्यावे. महिलांनी सेंद्रिय शेतीकडे वळणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन कृषी विज्ञान केंद्र, सगरोळीच्या संचालिका डॉ. माधुरी रेवणवार यांनी केले. त्या माजलगाव विकास प्रतिष्ठानतर्फे आयोजित महिला मेळाव्यात बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंगलाताई सोळंके या होत्या. कार्यक्रमाची सुरुवात ङ्गआम्ही घासून ठेवली ग्रामसभेची तलवारङ्क या प्रेरणादायी गीताने झाली. रेखा होके यांच्या मार्गदर्शनाखाली सिंदफणा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट नृत्य सादरीकरण केले. तसेच सखाराम जोशी आणि प्रवीण मडके यांच्या दिग्दर्शनाखाली सामाजिक आशयाचे पथनाट्य 'लढा महिला राजसत्तेचा' शाळेच्या शिक्षिकांनी सादर केली. माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या सचिव नीला देशमुख यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या कार्याचा आढावा मांडला. ॲड. पल्लवी सोळंके यांनी शक्ती कायदा याबाबत महिलांना सविस्तर माहिती दिली. आपल्या भाषणात भीम रासकर यांनी महिलांना प्रेरणा देताना ङ्गआम्ही सख्या नाही पण पक्क्या बहिणी, सांदी कोपऱ्यात



राहायचं नाय, राज्य करायला घाबरायच नाय, अशा घोषणांनी महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. महिला राजसत्तेसाठी आपण सर्वतोपरी म दत करू असे त्यांनी जाहीर केले. अनेक महिला सरपंचांच्या चातुर्याचे अनुभव सांगत महिलांनी व्यापक राजकारणावरही बोलले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. प्रत्येक महिलेनं किमान एक सत्ता केंद्र काबीज करण्याचा प्रयत्न करावा, ग्रामपंचायतीचे काम प्रत्यक्ष पाहावे आणि विरोधकांशी संवाद साधायला शिकावे, असेही त्यांनी नमूद केले. म हिलांच्या चारित्र्यावर अनेकदा हल्ले केले जातात, मात्र अशा वेळी खंबीरपणे उभे राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील स्वावलंबी महिलांचा सत्कार व्हावा आणि महिलांनी जे जमत नाही तेही करून दाखवावे, असे आवाहन त्यांनी केले. ङ्गमहिलांचा खरा दागिना म्हणजे ताठ मान आणि ताठ कणाङ्क असे प्रभावी प्रतिपादनही त्यांनी केले. कृषी विज्ञान केंद्र, सगरोळीच्या संचालिका डॉ. माधुरी रेवणवार यांनी आपल्या भाषणात ज्ञान आणि विज्ञान यांच्या साहाय्याने सेंद्रिय शेती करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. शेतीतील उत्कृष्ट कार्याबद्दल ज्ञानगंगा शेतकरी बचत गट तसेच हिरकणी महिला शेतकरी गटाचा सत्कार करण्यात आला. प्रीती कदम यांचा सेंद्रिय शेती करत असल्यामुळे सत्कार करण्यात आला. यावेळी माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या 'दिशा परिवर्तनाच्या' या वार्षिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. माजलगावच्या नगराध्यक्षा शिफा चाऊस यांनी मनोगत व्यक्त करताना ङ्गमी नगराध्यक्षा असले तरी त्यापूर्वी आई, बहीण आणि सून आहे. त्यामुळे तुमचे दुःख हे माझे दुःख आहे,ङ्क असे भावनिक मत व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी ॲड. पल्लवी सोळंके, मस्साजोगच्या सरपंच वर्षा सोनवणे, समाजसेवक धनंजय देशमुख, कवी प्रभाकर साळेगावकर, डॉ. जनक चौरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिंदफणा पब्लिक स्कूलच्या शिक्षिका शालिनी गडाख आणि अनुराधा सोळंके यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. वरुण तौर यांनी मानले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात मंगलाताई सोळंके यांनी माजलगाव विकास प्रतिष्ठान असेच सामाजिक उपक्रम घेत राहील अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाची सांगता संघटनेची ढाल गीताने झाली. माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या संघटिका उर्मिला चोपडे, शोभा डाके,प्रभा गंगणे आणि राधा शिंदे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली.

# आ.धनंजय मुंडे यांची ग्रामपंचायत सदस्य प्रविण पवार यांनी घेतली सदिच्छा भेट

## दारावती तांडा येथील जलजीवन मिशनची रखडलेली कामे १५ दिवसांत पूर्ण होणार



■ परळी वैद्यनाथ/प्रतिनिधी

लामण तांडा ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या दारावती तांडा येथे जलजीवन मिशन योजनेअंतर्गत सुरू असलेली पाणीपुरवठा कामे गेल्या दोन वर्षांपासून रखडलेली असल्यामुळे गावात पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत सदस्य प्रविण पवार यांनी माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे साहेब यांची सदिच्छा भेट घेऊन गावातील परिस्थितीची सविस्तर माहिती दिली.

यावेळी दारावती तांडा येथील जलजीवन मिशनच्या कामांमुळे गावकऱ्यांना होत असलेल्या अडचणींबाबत चर्चा करण्यात आली. त्यावर आमदार धनंजय मुंडे साहेब यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी तात्काळ संपर्क साधून प्रलंबित कामे लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

तसेच, पंधरा दिवसांच्या आत जलजीवन मिशनची रखडलेली कामे पूर्ण करून गावातील पाणी प्रश्न सोडवला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. त्यामुळे दारावती तांडा येथील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून लवकरच गावातील पाण्याची समस्या मार्गी लागणार आहे.

# शिक्षक चालवतात तेरा वर्षांपासून अविरत पाणपोई

## उमापुर येथे आदर्श शिक्षक सुभाष काळे यांच्या वतीने पाणपोईचे उद्घाटन

बीड/प्रतिनिधी

राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या विचाराणे प्रेरित झालेले समाजसेवक तथा आदर्श शिक्षक सुभाष काळे हे गेल्या तेरा वर्षांपासून गेवराई तालुक्यातील उमापुर येथे उन्हाळ्यामध्ये पाणपोई व शंभर पाणओठे अविरतपणे चालवतात. या पाणपोई व शंभर पाणओठ्याचे उद्घाटन दि. ८ मार्च२०२६ रोजी ह.भ.प. रघुनाथजी निंबाळक, सर्पराज्ञीचे सिद्धार्थ सोनवणे, गुलाब भोलेसर, दत्ता प्रभाळे, आदर्श शिक्षक धर्मराज करपे, राजेंद्र भोलेसर सह गावातील नागरिकांच्या उपस्थितीमध्ये उद्घाटन करण्यात आले.गेवराई तालुक्यातील उमापुर हे अत्यंत महत्वाचे गाव असून या ठिकाणी नागरिकांची रोज वर्दळ असते. सर्वसामान्य लोकांची पाण्यासाठी गौरसोय होवून नये या उदात्त हेतूने गेल्या १३ वर्षापासून ही पाणपोई प्रत्येक उन्हाळ्यात सुरू असल्याने याचा लाभ परिसरातील सर्वसामान्य नागरिकांना नक्कीच होतो. सुभाष काळे हे कायम समाजसेवा करत असतात. पाण्याबरोबरच संघर्ष धान्य बँकेच्या माध्यमातून



सर्वसामान्य गरजुवंतांना धान्य पोहोच करण्याची जबाबदारी ते स्वतः पार पाडतात. राष्ट्रसंत गाडगेबाबांना अभिप्रेत असणारा खराखुरा उपक्रम उमापूर तालुका गेवराई या गावांमध्ये समाजसेवक सुभाष काळे हे गेल्या तेरा वर्षापासून राबवत आहेत याचा मनस्वी अभिमान वाटत असल्याचे मत सिद्धार्थ सोनवणे यांनी व्यक्त केले. राष्ट्रसंत गाडगेबाबांच्या जयंतीनिमित्त चालू असलेल्या या उपक्रमाचा खरोखरच सर्वांनी आदर्श घ्यावा असे सांगून गावागावांमध्ये वाचनाची चळवळ अधिक बळकट करावी असे गुलाब भोले सरांनी सांगितले. यावेळी निंबाळकर महाराज यांनी या कार्यक्रमाला शुभेच्छा देऊन सुभाष काळे, दत्ता चौरे व त्यांची पूर्ण टीम जर पशुपक्षांची काळजी घेऊण या पशु पक्षांना शंभर पानवठे उपलब्ध करून देत असतील तर यापेक्षा मोठे कोणतेच पुण्य नाही असे सांगितले. यावेळी कार्यक्रम यशस्वीतेसाठी सरपंच किरण आहेर, रावसाहेब काळे, जयदीप औटी, महादेव औटी, रावसाहेब देशमुख, राजीव पोकळे, कृष्णा सामसे, फादर कापसे, अमोल राजे देशमुख कैलास तांबे, बप्पासाहेब काकडे, दादा पोकळे, श्याम पोकळे, श्याम वाघमारे सर, महेश काकडे, ओम प्रकाश राऊत, रवींद्र काळे गावातील सर्वच मान्यवर यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदर्श शिक्षक तथा समाजसेवक सुभाष काळे यांनी तर प्रास्ताविक माऊली पिंगळे यांनी करून पशु पक्षांना पाणवटे देण्यासंदर्भात सविस्तर माहिती दत्ता चौरे यांनी दिली. कार्यक्रमाचे आभार संघर्ष धान्य बँकेचे संचालक, आदर्श शिक्षक धर्मराज करपे यांनी करून राष्ट्रसंत गाडगेबाबांच्या कार्यावर तसेच सतराव्या शतकामध्ये गावागावांमध्ये पाणपोई चालविणाऱ्या राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांच्याही जिवणावर प्रकाश टाकला.



नांदेड: जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय कलाल, गौड,तेलंग समाज युवा संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य च्या वतीने भोकर नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगरसेविका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मा. सौ वैशाली गणेश बोलेवार यांचा कलाल समाजाच्या वतीने भव्य दिव्य सत्कार करण्यात आला याप्रसंगी कलाल समाजातील बाबाराव नंदेवार,गंगाधर नंदेवाड,नागनाथ कुच्चेवार शंकर रायपलवार व राष्ट्रीय कलाल गोड तेलंग युवा संघर्ष समितीचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेश अध्यक्ष सुनीत अनंतवार इतर उपस्थित होते..

## प्रा. विष्णू बोचरे यांना पीएच. डी पदवी प्रदान

माजलगाव

तालुक्यातील जदिद जवळा या गावातील प्रा. विष्णू शिवाजीराव बोचरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत इंग्रजी विषयात पीएच. डी प्रदान करण्यात आली आहे.

प्रा विष्णू बोचरे यांनी डॉ रुपाली पालोदकर मॅडम, प्रोफेसर तथा इंग्रजी विभाग प्रमुख, यशवंतराव चव्हाण,कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिल्लोड , जि. छत्रपती संभाजी नगर यांच्या मार्गदर्शनाखाली नॅरेटिव्हस ऑफ डायस्पोरा, नेशन अँड कल्चर:अ स्टडी ऑफ चित्रा बॅनर्जी दिवाकरुणी अँड चिमण्डा आदीची या विषयावर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शोध प्रबंध सादर केला होता. त्यांच्या संशोधन कार्याची दखल घेऊन त्यांना विद्यापीठाने पीएच. डी प्रदान केली आहे. प्रा. विष्णू बोचरे यांच्या यशाबद्दल डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इंग्रजी विभागाचे विभाग प्रमुख डॉ मुस्तजीब खान सर, संशोधक मार्गदर्शक डॉ रुपाली पालोदकर यांनी अभिनंदन केले.



## विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेन्द्र मिश्र यांनी घेतली बैठक



बीड/प्रतिनिधी

दिनांक ०६ मार्च पासुन विशेष पोलीस महानिरीक्षक संभाजीनगर परीक्षेत्र यांचे बीड जिल्हा पोलीस दलाचे वार्षीक तपासणी सुरु केली आहे. ज्यामध्ये दिनांक ०६ मार्च रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेन्द्र मिश्र यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व शाखांना भेट देवुन पोलीस मुख्यालय, मोटार परीवहन विभाग, स्थानीक गुन्हे शाखा, जिल्हा विशेष शाखा, दहशतवाद विरोधी शाखा, अनैतीक मानवी व्यापार प्रतिबंधक विभाग, दामिनी पथक, भरोसा सेल, शहर वाहतुक शाखा, आर्थीक गुन्हे शाखा, दोषसिद्धी विभाग, सायबर पोलीस ठाणे, बॉम्ब शोधक व नाशक विभाग, पोलीस दवाखाना येथे भेट देवून कामकाजाचा आढावा घेतला. तर दिनांक ०७ मार्च रोजी पोलीस दलाचा शिस्तीचा महत्वाचा भाग असलेल्या समारंभ कवायतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार पोलीस मुख्यालय येथे समारंभ कवायत त्यानंतर पिटी परेड, लाठी कवायत, सेन्ट्री ड्रील, स्वयंचलीत हत्यारांची कवायत, रायफल कवायत, बॅन्ड परेड, व दंगा काबु कवायत घेण्यात आली. सर्व प्रात्याक्षीकांबद्दल विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेन्द्र मिश्र यांनी समाधान व्यक्त केले. तसेच बीड जिल्हा पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांच्या कामासंबंधीच्या अडीअडचणी जाणुन घेण्यासाठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये मागील वर्षीच्या तपासणीवेळी अंमलदारांनी मांडलेल्या समस्या सोडविण्यासाठी केलेली कारवाई बाबत माहीती देण्यात आली. तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार व यांनी नव्याने मांडलेल्या समस्या/अडचणी ऐकुन घेवुन त्यांचे निराकरण करण्यात आले आहे.त्यानंतर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांची गुन्हे आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी गेवराई पोलीस स्टेशनने मोटार सायकल चोरी प्रकरणात केलेल्या उल्लेखनीय कामगीरीबाबत पोलीस निरीक्षक किशोर पवार व अधीकारी , अंमलदारांचा प्रशस्तीपत्र देवून सन्मान करण्यात आला. तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बंटेवाड व अधीकारी , अंमलदार यांचा चांगल्या कामगीरीबद्दल प्रशस्तीपत्र देवून सन्मान करण्यात आला. तसेच गेवराई पोलीस स्टेशनने मोटार सायकल चोरीचे उघड केलेल्या रॅकेटबाबत केलेल्या तपासाच्या कामगीरीचे झझढ द्वारे सादरीकरण करण्यात करण्यात आले.

## पॅरामेडिकल कोर्सच्या विद्यार्थ्यांच्यां पालकांचे आ.प्रकास सोळंकेना निवेदन सादर

माजलगाव

पॉरामेडीकल कोर्सच्या शासकीय व खाजगी माहा विद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ओबीसी विद्यार्थ्यांच्या धर्तीवर एस.ई.बी.सी.च्या विद्यार्थ्यांना सवलत देण्यात यावीत या मागणीसाठी पॉरामेडीकल कोर्सच्या विद्यार्थीच्या पालकांनी दि ०८ मार्च रविवार रोजी प्रतिनिधिक स्वरूपात आ.प्रकाश सोळंके यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आ.प्रकाश सोळंके यांनी हा प्रश्न अधिवेशनात मांडण्यात येईल असे आश्वासन पॉरामेडीकल कोर्सच्या विद्यार्थीच्या पालकांना दिले



यासंदर्भात पॉरामेडीकल कोर्सच्या विद्यार्थीच्या पालकांनी दि ०८ मार्च रविवार रोजी आ.प्रकाश सोळंके यांना दिलेल्या निवेदनात असे नमूद केले आहे की,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर (घाटी ) या महाविद्यालयात पॅरामेडिकल कोर्से सला प्रवेस घेते वेळी एस.ई.बी. सी.प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ओबीसीच्या विद्यार्थ्या प्रमाणे फिस मध्ये सवलत देऊन प्रवेस झाले.मात्र शिष्यवृत्तीच्या महाडीबीटी वर ऑनलाइन फॉर्म भरताना इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना कॉलेज व पॅरामेडिकलच्या सर्व कोर्सचे ऑप्शन येत आहे.मात्र एस ई बी सी च्या विद्यार्थ्यांना महाडीबीटी वर कॉलेज व कोर्सचे ऑप्शन येत नाही.ही योजना एस ई बी सी.च्या विद्यार्थ्यांना लागू नाही आसे दाखवत आहे.शासनाने ओबीसी च्या सर्व योजना एस ई बी सी.च्या विद्यार्थ्यांना लागू केलेल्या आसताना मात्र शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पॅरामेडिकल कोर्सला कोणतीही योजना लागू नाही.मेडिकलच्या इतर सर्व कोर्सला विविध योजना लागू आहेत.महाराष्ट्रात ६४२ हून आधिक आभ्यासक्रमांना मुलींना मोफत शिक्षण मिळत आहे.त्यात पॅरामेडिकल कोर्स का नाहीत.? मात्र पॅरामेडिकल कोर्सला कोणतीही योजना का लागू नाही ? या मुळे मराठा समाजाती शेकडो मुला / मुलींना याचा आर्थिक फटका बसत आहे.ही बाब आपण सरकारच्या निदर्शनास आणून द्यावी व मराठा समाजाती एस ई बी सी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना न्याय देऊन पॅरामेडिकल कोर्सेसला राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू करावी.तसेच पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना लागू करवी अशी मागणी पॉरामेडीकल कोर्सच्या विद्यार्थीच्या पालकांनी आ.प्रकाश सोळंके यांच्याकडे केल्यानंतर आ.सोळंकेंनी हा प्रश्न तातडीने औचित्याचा मुद्द्यावर अधिवेशनात सभागृहात मांडुन हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन यावेळी पॉरामेडीकल कोर्सच्या विद्यार्थीच्या पालकांना दिले .

## पाचोंदा दलित महिला दुहेरी हत्याकांडा मध्ये ॲट्रॉसिटी कलमवाढ करावी

### सोमवारी डीवायएफआयचे जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने

माहूर प्रतिनिधी

तालुक्यातील पाचोंदा येथील दोन सख्या जावांचा खून करून सोने लुटल्याची घटना २० नोव्हेंबर रोजी मयतांच्या स्वतः च्या शेतात घडली होती. कापूस वेचणीसाठी गेलेल्या महिलांचे पाचोंदा दुहेरी खून प्रकरणातील आरोपी विरोधात ॲट्रॉसिटी कलम वाढ करावी म्हणून मयत महिलांच्या दोन मुलांनी जिल्हाधिकारी कार्यालया समोर १२ फेब्रुवारी पासून नऊ दिवस आमरण उपोषण केले आहे. पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांनी उपोषणार्थीकडे दुर्लक्ष केल्यामुळे पाचव्या दिवशी उपोषणार्थी नागेंद्र अडागळे व विकास अडागळे या दोघांना सरकारी दवाखान्यात दाखल करावे लागले होते.

बौध्द समाजातील अंतकला आडागळे आणि अनुसयाबाई आडागळे या सख्या दोघी जावांचा निर्घृन खून करून गळ्यातील मंगळसूत्र व इतर दागिने चोरून नेले होते. यातील दोन आरोपीना पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार १२ तासाच्या आत अटक करण्यात आली होती. यातील एक आरोपी गजानन येरजवार हा पाचोंदा गावाजवळील गावचा रहिवासी असून त्याचे नेहमीसाठी पाचोंदा येथे येणेजाने होते. तो मयत महिलांना पूर्वीपासून ओळखत होता. असा लेखी जवाब गावातील सरपंच विलास तोरकड व इतर प्रतिष्ठित लोकांनी पोलीस ठाणे माहूर येथे लेखी स्वरूपात ३० नोव्हेंबर रोजी दिला आहे. दोन्हीही मयत महिलांच्या मुलांनी दि.१५ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस निरीक्षक माहूर यांना लेखी निवेदन देऊन खुनातील आरोपी विरुद्ध ॲट्रॉसिटी व मोका गुन्हा दाखल करून कलम वाढ करण्याची मागणी वेळोवेळी केली आहे. प्रचलित कायद्यानुसार मयत महिलांच्या उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस निरीक्षक माहूर कलमवाढ करण्यात उदासीन असल्यामुळे खून झालेल्या दोन्हीही महिलांच्या मुलांनी नामे नागेंद्र साहेबराव आढागळे व विकास अशोक आढागळे रा. पाचोंदा ता.माहूर यांना संरक्षण व पुनर्वसन मिळणे कठीण झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड समोर बेमुदत आमरण उपोषण सुरु केले होते त्या उपोषणास मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व डीवायएफआयच्या वतीने जाहीर पाठिंबा दिला आहे. पीडित उपोषणार्थिंच्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीतर तीव्र आंदोलन छेडणार असा इशारा देखील उपरोक्त पक्ष संघटनेने दिला होता.अद्याप ॲट्रॉसिटी कलम वाढ झाली नसल्याने तातडीने कलम वाढ करून मयत महिलांच्या कुटुंबियांना न्याय द्यावा म्हणून डेमोक्रॅटीक युथ फेडरेशन ऑफ इंडिया च्या वतीने ९ मार्च सोमवारी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने करण्यात येणार आहेत. अशी माहिती अध्यक्ष कॉ.जयराज गायकवाड, कॉ. मंगेश वट्टेवाड, कॉ. राहूल नरवाडे यांनी निवेदनाद्वारे दिली आहे.

## जागतिक महिला दिनानिमित्त जामखेड येथे विविध क्रीडा स्पर्धा पार पडल्या

शिरूर (का) प्रतिनिधी :

जागतिक महिला दिनानिमित्त ग्रामीण विकास केंद्र, जामखेड व कोरो इंडिया, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने जामखेड येथे जिल्हास्तरीय युवती, विवाहित, एकल, विधवा व परित्यक्ता महिलांसाठी दोन दिवसीय विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धा दि. ७ व ८ मार्च २०२६ रोजी निवारा बालगृह, मोहा फाटा, समता भूमी, जामखेड जिल्हा अहिल्यानगर येथे पार पडल्या.महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांचा आत्मविश्वास वाढावा तसेच महिलांना सन्मान मिळावा यावा संविधानिक मूल्य माहित असावेत आपल्या हक्क व अधिकार कळावेत या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच महिलांना संविधानाने दिलेल्या अधिकारांची जाणीव व्हावी आणि समाजात समानता व स्वाभिमानाची भावना बळकट व्हावी हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता.या कार्यक्रमाचे उद्घाटन दि. ७ मार्च रोजी सकाळी ११ वाजता नवनिर्वाचित नगरअध्यक्षा सौ. प्रांजलताई चिंतामणी यांच्या हस्ते संविधान प्रतिमेस पुष्प अर्पण करून करण्यात आले. कार्यक्रमास सरपंच भीमराव कापसे (मोहा), सोनम धीवर कोरो इंडिया मुंबई नगरसेविका सौ. संगीता भालेराव, सौ.जया गव्हाळे, सौ.आशाबाई टकले, येडेश्वर नागरगोजे संतोष हापटे सर सचिन चव्हाण अभिनेता सुरेखाताई सदाफुले आदी मान्यवर उपस्थित होते.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पायल ताई बाफना (उद्योजक) होत्या तर



प्रमुख पाहुणे अलकाताई जाधव सविता मोरे संजय लहाने उद्योजक सोमनाथ भैलुमे दत्ता भालेराव अप्पा सरोदे रूपाली आढाव उपस्थित होतेयावेळी प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते लघुचित्रपट काळीमा प्रदर्शित करण्यात आला दि. ८ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता बक्षीस वितरण सोहळा पार पडला. स्पर्धेत खो-खो, कबड्डी महिला व कबड्डी युवती व महिला महिलांसाठी १०० मीटर धावणे तसेच दोरीवरील उड्या या वैयक्तिक स्पर्धांचा समावेश होता जवळपास श्रीगोंदा कर्जत जामखेड खर्डा काष्टी येथून १७ संघ व वैयक्तिक खेळामध्ये ९२ महिलांनी सहभाग नोंदवला होता ग्रामीण विकास केंद्र, जामखेड संघाने प्रथम क्रमांक पटकावला. या संघाला ८००० रुपये, ट्रॉफी व मेडल देण्यात आले. कर्जत येथील जगदंबा संघ द्वितीय क्रमांक पटकावला (५००० रुपये, ट्रॉफी व मेडल) तर जामखेड येथील मोहा निवारा बालगृह संघाने तृतीय बक्षीस मिळवले आहे (३००० रुपये, ट्रॉफी व मेडल) या संघाला देण्यात आले

महिला व युवती गटात कर्जत येथील कुळधरण जगदंबा संघाने प्रथम बक्षीस पटकावले आहे (८००० रुपये, ट्रॉफी व मेडल), तसेच निवारा बालगृह संघाने द्वितीय बक्षीस पटकावले आहे (५००० रुपये, ट्रॉफी व मेडल) तर कर्जत येथील राजमाता संघाने तृतीय बक्षीस पटकावले आहे (३००० रुपये, ट्रॉफी व मेडल) विजेत्या संघांना रोख रक्कम ट्रॉफी देण्यात आले आहे.महिला कबड्डी स्पर्धेत

ग्रामीण विकास केंद्र संघाने प्रथम क्रमांक पटकावला आहे त्या संघाला ८००० व ट्रॉफी मेडल देण्यात आली आहे खर्डा शिवपट्टणम संघाने द्वितीय क्रमांक मिळवला आहे ५००० व ट्रॉफी मेडल देण्यात आली आहे श्रीगोंदा येथील अहिल्या संघाने तृतीय बक्षिसाचे मानकरी ठरले आहे त्या संघांना ३००० रुपये, ट्रॉफी व मेडल देण्यात आले.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, मोहन दत्तु गुंड यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर्स एम.एस.सी.बी ऑफीस जवळ माळीवेस ,बीड- ४३११२२ येथे छापून साप्ताहिक क्रांतीवीर कार्यालय, गुंड गल्ली केज ता.जिल्हा जि.बीड - ४३११२३ येथे प्रकाशीत केले आहे. मो ९४२३९७९४९२ Email- ID skrantiveer66gmail.com या अंकामध्ये प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही,वाद विवाद केज न्यायालय अंतर्गत. कार्यकारी संपादक आप्पासाहेब महानोर मो ९५११७१२५९२
This News paper's owner, printr, editor, Mohan Dattu Gund printed this at the Mauli Offset Printers, Near Office MSCB at Malives, Beed-431122. and published at Weekly Krantiveer Office, Gund Galli, Kej Tq. Kaij Dist Beed Bead-431123. Mob 9423979492, Email ID– skrantiveer66@gmail.com Editor is not totally agree or disagree with the news and articles this issue. Disputes under jurisdiction of Kaij court. Executive Division Appasaheb Mahanor, Mo-9511712592